# राष्ट्रीय, राज्य नागरी उपजिवीका अभियान

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
नगर परिषद प्रशासन शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

क्र. कक्ष - २०/सुजयो/ युएलएम/अका/ कावि - २२० /२०१५
दिनांक - ०८/०७/२०१५

## लेखी परीक्षेबाबत सुचना

**सहाय्यक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक या कंत्राटी पदासाठी होणाऱ्या लेखी परीक्षेबाबत पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत असून संबधितांनी नोंद घ्यावी.**

१) समुदाय संघटक :- लेखी परीक्षा दिनांक २६ जुलै २०१५ **वेळ** :- सकाळी ११.०० ते दु. १२.००

२) **सहाय्यक प्रकल्प अधिकारी** :- लेखी परीक्षा दिनांक २६ जुलै २०१५ **वेळ** :- दुपारी १.०० ते दु. २.००

स्थळ :- **जिल्हा परीषद मुलींची शाळा, कॅम्प, अमरावती. Ex.** Government Girls High School, Camp, Amravati

१) लेखी परीक्षा ८० गुणांची असेल, (४० प्रश्न, प्रति प्रश्न २ गुण एकुण गुण ८०) लेखी परीक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल, यात सामान्य ज्ञान, इंग्रजी मराठी भाषा, अंकगणित, वर्तमान सामाजिक घडामोडी, बौध्दिक क्षमता चाचणी, या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात येतील.

२) मुलाखत - लेखी परीक्षेतुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. मुलाखत २० गुणांची असेल. मुलाखतीबाबत माहिती स्वतंत्रपणे याच संकेतस्थळावर जाहिर केली जाईल.

३) लेखी परीक्षेमध्ये व मुलाखतीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या एकुण गुणांच्या आधारे गणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल.

४) एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवून देखील मुलाखतीस गैरहजर राहील्यास त्याचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही. मात्र एखाद्या उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा उमेदवार नेमणुकीस पात्र असेल.

५) लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेल्या गुणांची अंतिम गुणवत्ता यादी www.amravati.nic.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

६) वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना कागदपत्राच्या पडताळणीसाठी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेप्रमाणे दिलेल्या दिनांकास, वेळेवर जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे मुळ कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी, विहीत ठिकाणी उमेदवार कागद पत्राच्या छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्यांचे निवडीबाबत विचार करणार नाही.

७) जाहीरातीत नमुद दोन्ही पदांसाठी एकाच उमेदवाराने अर्ज सादर केले असल्यास व तो दोन्ही पदांचे लेखी परीक्षेसाठी पात्र असल्यास त्याला दोन्ही परीक्षा स्वतंत्रपणे द्याव्या लागतील.

८) जाहीरातीत नमुद दोन्ही पदांसाठी ५ वर्षे अनुभवाची अट अनिवार्य असल्याने उमेदवारांनी अर्जासोबत दाखल केलेल्या अनुभवाचे मुळ कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करावे. संबधिताने ज्या सामाजिक संस्थेचा / शासकीय विभागाचा अनुभवाचा दाखला सादर केलेला आहे. त्या सामाजिक संस्थेचे / शासकीय विभागाचे मुळ नियुक्तीपत्र किंवा पगार पत्रक किंवा उमेदवाराने संबधित ठिकाणी काम केले आहे असे सिध्द होवु शकणारे कोणतेही त्या कार्यालयाचे जावक क्रमांक व दिनांक नमुद असलेली कागदपत्रे सादर करावी लागतील. एखाद्या उमेदवाराच्या अनुभवा बद्दल शंका उपस्थित झाल्यास / तक्रार प्राप्त झाल्यास त्यांने अर्जात नमुद ठिकाणी नोकरी केली आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील, व या बाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी अमरावती यांचा निर्णय अंतिम राहील व तो संबधितांवर बंधनकारक राहील.

९) कोणत्याही उमेदवाराने शैक्षणीक अर्हता, वय, अनुभव, संगणक विषयक ज्ञान, दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र इ. बाबतीत खोटी कागदपत्रे सादर करुन कार्यालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आल्यास संबधिता विरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही केली जाऊ शकते याची नोंद घ्यावी, व निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अशा उमेदवारास अपात्र ठरविण्याचा अधिकार जिल्हाधिकारी अमरावती यांना असेल.

१०) लेखीं परीक्षेसाठी पात्र सर्व उमेदवारांना त्यांनी अर्जात नमुद केलेल्या पत्यावर पोस्टाव्दारे लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येत असून दि. २३ जुलै २०१५ पर्यंत प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास संबधितांनी दुय्यम प्रवेशपत्रासाठी या कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क करावा.

११) उमेदवाराने प्रवेशपत्रावर स्वतःचा फोटो चिकटवुन त्यावर राजपत्रीत अधिकारी यांचे व्दारे सांक्षाकन करुन घेणे आवश्यक आहे. राजपत्रित अधिकारी यांचे स्वाक्षांकन असल्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२) लेखी परीक्षा, मुलाखत, कागदपत्रे तपासणी इ.साठी उमेदवाराला स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**जिल्हाधिकारी अमरावती**
**तथा नियुक्ती प्राधिकारी**